# प्रेसनोट

दि.११/१०/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | एम.आय.डी.सी. पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.९३७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | नंदलाल मुरलीधर खैरे, पोलीस हवालदार, बक्कल नं.३०१, वर्ग–३, नेमणुक एम.आय.डी.सी. पो.स्टे., जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ३०,०००/– रुपये तडजोडी अंती १०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ---- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे कुटूंबिय व त्यांचे शेजारी राहणारे यांच्यामध्ये कचरा गोळा करुन पेटवून देण्याच्या कारणावरुन दि.१०/०७/२०२३ रोजी वाद झाला होता. सदर वादात तक्रारदार यांची भावजयी किरकोळ जखमी झाली होती म्हणून तक्रारदार यांनी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविला होता. त्याअनुषंगाने आरोपी लोकसेवक नंदलाल मुरलीधर खैरे, पोलीस हवालदार, बक्कल नं.३०१, नेमणुक एम.आय.डी.सी. पो.स्टे. हे तक्रारदार यांचे घरी पंचनामा करणेकरीता गेले होते. त्यावेळी आरोपी लोकसेवक खैरे यांनी तक्रारदार यांचे शेजारी हे तक्रारदार व त्यांचे भाऊ यांच्या विरोधात विनयभंगाची तक्रार देणार असल्याबाबत सांगितले होते व विनयभंगाची तक्रार न घेता किरकोळ तक्रार घेऊन प्रकरण मिटवुन घेण्याच्या मोबदल्यात ३०,०००/– रुपयाची लाच मागणी करत असल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे नोंदविली होती. त्यानुसार दि.२६/०७/२०२३ रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली सदर लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक खैरे यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १०,०००/– रुपये लाचेची मागणी करुन ती स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आज दि.११/१०/२०२३ रोजी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

**(प्रविण लोखंडे)**
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर